	दाखल दिनांक १९.०९.२०२५
	नोंदणी दिनांक- १९.०९.२०२५
	निकाल दिनांक- ०४.०५.२०२६
	कालावधी - वर्षे महिने दिवस. ०० ०७ १५

भाग -अ

[परिच्छेद क्र.४४(१), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका]

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा ता.पन्हाळा,
जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात.
(पिठासीन अधिकारी : एस.व्ही.जंगमस्वामी)

नियमीत फौजदारी खटला क्रमांक ९३/२०२५ निशाणी क्र. २२/ब

न्यायनिर्णय दिनांक :०४/०५/२०२६	
प्रथम खबर अहवाल/ अपराध क्र. १३८ /२०२५	पन्हाळा पोलीस ठाणे, पन्हाळा जि.कोल्हापूर भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८ (१),११५ (२) आणि ३५२ सह कलम ३(५) प्रमाणे.
अभियोग पक्ष	महाराष्ट्र सरकार, मार्फत : सहा.पोलिस निरिक्षक पन्हाळा पोलीस ठाणे, ता.पन्हाळा जि.कोल्हापूर.
अभियोग पक्षातर्फे अभियोक्ता	अॅड. एस.एस.गर्जे सहा.सरकारी अभियोक्ता
विरूद्ध	
आरोपी	१. हिंदुराव बाबु सावेकर,व.व.५२,धंदा-शेती, २. सजित हिंदुराव सावेकर, व.व.२८,धंदा-घरकाम दोघे रा.दळवेवाडी, ता.पन्हाळा जि. कोल्हापूर.
आरोपीतर्फे विधिज्ञ	अॅड. जी.जी.नानीवडेकर, विधीज्ञ

भाग -ब

[परिच्छेद क्र.४४(२), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका]

अपराध घडल्याचा दिनांक	०२.०७.२०२५
प्रथम खबर अहवाल दिनांक	०३.०७.२०२५
चार्जशीट (अंतीम अहवाल) दिनांक	१९.०९.२०२५
दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक	१६.१२.२०२५
पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक	१६.०३.२०२५
न्यायानिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक	०४/०५/२०२६
न्यायनिर्णय दिनांक	०४/०५/२०२६
शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर	.....

आरोपींचा तपशील

अ. क्र.	आरोपीचे नांव	अटक दिनांक	जामीनावर सोडल्या चा दिनांक	गुन्हा / आरोप	दोषी किंवा निर्दोष	शिक्षा	आरोपी बंदी असलेला कालावधी बी.एन.एस.एस. ४६८ नुसार सुट देणेकरीता
१.	हिंदुराव बाबु सावेकर,	बी.एन.एस. ३५(३) प्रमाणे नोटीस दिली	--	भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८ (१),११५ (२), ३५२ सह कलम ३(५) प्रमाणे.	आरोपींना निर्दोष मुक्त करणेत येते	...	...
२.	सजित हिंदुराव सावेकर	--"--		--"--	--"--	--	

भाग -क

[परिच्छेद क्र.४४(३), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका]

अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :

क्रमांक	नांव	पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप
सा.क्र. १	वर्षा सजित सावेकर	फिर्यादी
सा.क्र. २	ओमकार बापु दळवी	जखमी साक्षीदार
सा.क्र. ३	बापु गणपती दळवी	जखमी साक्षीदार

ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :

क्रमांक	नांव	पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप
ब.सा.क्र.१	निरंक	निरंक

क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :

क्रमांक	नांव	पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप
को.सा.क्र.१	निरंक	निरंक

अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी

अ. अभियोग पक्ष :

अ.क्र.	निशाणी क्रमांक	वर्णन
१.	निशाणी १४/क	फिर्याद वरील सही

ब. बचाव पक्ष :

अनुक्रमांक	निशाणी क्रमांक	वर्णन
१.	१७/क	घटनास्थळ/जप्ती पंचनामा
२.	१८/क	जखमी साक्षीदार ओमकार दळवी याचे वैद्यकिय प्रमाणपत्र
३.	१९/क	फिर्यादी वर्षा सावेकर हिचे वैद्यकिय प्रमाणपत्र
४.	२०/क	जखमी साक्षीदार बापु दळवी याचे वैद्यकिय प्रमाणपत्र

क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी :-

अनुक्रमांक	निशाणी क्रमांक	वर्णन
१.	निरंक	निरंक

ड. मुद्देमाल :

अनुक्रमांक	मुद्देमाल क्रमांक	वर्णन
१.	२९/२०२५	चार पेरी व चार गाठ असलेली जुनी वापरती एक चिव्याची काठी.

न्यायनिर्णय
(घोषित दिनांक ०४/०५/२०२६)

१. प्रस्तुतचा खटला हा आरोपींचे विरूद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८ (१),११५ (२) आणि ३५२ सह कलम ३(५)अन्वये चालविण्यात आला.

अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन -

२. आरोपी क्र. १ हा फिर्यादीचा सासरा आहे. आरोपी क्र.२ सजित हा फिर्यादीचा पती आहे. दि. ०२.०७.२०२५ रोजी २०.०० वाजणेचे सुमारास पन्हाळा येथील फिर्यादी हिचे राहते घराचे समोर, ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर येथे आरोपी क्र. २ याने फिर्यादीस मोबाईलला स्क्रॅस पाडलेबाबत विचारणा करुन मारहाण केलेने फिर्यादीचे वडील घरी आले असता फिर्यादी ही त्यांना हकीकत सांगत असताना आरोपी क्र. २ यांने त्यांना शिवीगाळ केली व आरोपी क्र. १ याने त्याचे हातातील काठीने पाठीत मारहाण करत असताना फिर्यादी या सोडवण्यासाठी गेल्या असता आरोपी क्र. २ याने तिच्या दोन्ही पायावर काठीने मारहाण करुन त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण केलेबाबत फिर्यादी यांचे वडीलांनी त्यांचे घरी फोन करुन सांगीतले असता फिर्यादीचा भाऊ ओंकार, चुलत भाऊ आकाश व आई मेघा असे सर्वजण भांडण सोडविण्यासाठी आले असता आरोपी क्र. १ यांनी फिर्यादीच्या भावाच्या मानेवर काठीने मारहाण करुन जखमी केले अशा स्वरुपाची फिर्याद फिर्यादीने पन्हाळा पोलीस ठाणे येथे दाखल केली.

३. फिर्यादीने दाखल केलेल्या फिर्याद वरुन ठाणे अंमलदार यांनी गु.र.नंबर १३८/२०२५ हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास हा पोलिस हेड कॉन्स्टेबल एस.एस.पाटील यांच्याकडे दिला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळावरील एक चिव्याची काठी जप्त करुन त्याचा घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यांनी फिर्यादी व जखमी साक्षीदार यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यांनी तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपी क्र.१ व २ यांचे विरुध्द भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम ११८

(१),११५ (२) आणि ३५२ सह कलम ३(५) निशाणी क्र.८ अन्वये दोषारोप नोंदविला व निशाणी क्र. ९ व १० अन्वये आरोपी क्र.१ व २ यांचे निवेदन नोंदविले. त्यामध्ये आरोपींनी गुन्हा अमान्य करुन त्यांचेविरुध्द खटला चालविण्याकामी विनंती केली.

५. अभियोग पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली.

६. आरोपीं विरुध्द अभिलेखावर कोणताही दोषात्मक पुरावा न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन हे सोडून देण्यात आले.

७. अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता अॅड.एस.एस.गर्जे आणि बचाव पक्षातर्फे विधिज्ञ अॅड जी.जी.नानीवडेकर यांचा युक्तीवाद ऐकला. खटल्याचे निकालासाठी माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले, त्यावर मी नोंदविलेले कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणेः

अ.नं.	मुद्दे	निष्कर्ष
१.	अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की दिनांक दि. ०२.०७.२०२५ रोजी २०.०० वाजणेचे सुमारास पन्हाळा येथील फिर्यादीचे राहते घराचे समोर ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीचे वडीलांना हातातील काठीने पाठीत आणि फिर्यादीचे भावास मानेवार काठीने मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली आणि त्या काठीचा वापर सदर गुन्हयात हत्यार म्हणुन केला आणि त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ?	**...नकारार्थी.**
२.	अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन फिर्यादीला इच्छापुर्वक साधी दुखापत केली व त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ११५(२) सह कलम ३(५) अन्वये गुन्हा केला ?	**...नकारार्थी.**
३.	अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पुरःसनार्थ फिर्यादीचा,	

	तिच्या वडिलांचा आणि भावाचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांना शिवीगाळ करून त्यांना प्रक्षोभित केले व त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कृत्य करण्यात उद्युक्त केले व त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ३५२ सह कलम ३(५) प्रमाणे अन्वये गुन्हा केला ?	**...नकारार्थी.**
४.	कोणता आदेश ?	**...अंतिम आदेशाप्रमाणे**

का र ण मि मां सा

८. अभियोगपक्षाने आरोप सिध्दी पृष्ठर्थ फिर्यादी वर्षा सजित सावेकर (सा.क्र.१) हिची साक्ष (निशाणी क्र.१३), जखमी साक्षीदार ओमकार बापु दळवी याची साक्ष (निशाणी क्र.१५) आणि जखमी साक्षीदार बापु गणपती दळवी याची साक्ष (निशाणी क्र.१६) वर नोंदविली. फिर्यादी व आरोपी पक्षामार्फत सदर प्रकरणासंदर्भात न्यायालयाबाहेर त्यांची तडजोड झाल्याबाबत तशी तडजोड पुरसीस (निशाणी क्र.१२) वर दाखल करण्यात आली. आरोपी पक्षामार्फत अभिलेखावरील घटनास्थळ/जप्ती पंचनामा (निशाणी क्र.१७) आणि फिर्यादी व जखमी साक्षीदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र. १८ ते २०) हे मान्य करण्यात आले. त्यानंतर फिर्यादीने आपला पुरावा हा निशाणी क्र. २१ वर पुरसिस दाखल करुन बंद केला. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा हा निशाणी १ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला.

<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत</u> :

९. मुद्या क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रित चर्चिले आहेत. फिर्यादी वर्षा (सा.क्र.१) हिने आपल्या पुराव्यात असे सांगितले की, घटना ही कधी घडली हे तिला आठवत नाही. त्यावेळेस तिच्यामध्ये व तिच्या पतीमध्ये फोन वरुन वाद झाले होते. त्यानंतर तिचे वडील तिच्या घरी आले होते. त्यावेळेस लाईट गेली होती आणि त्यावेळेस तिला कोणाचा धक्का लागला हे तिला माहिती नाही. त्यानंतर तिने फिर्याद दाखल केली. तिने फिर्यादवरील तिची सही ओळखली परंतू फिर्याद मधील मजकूर हा तिला माहिती नसल्याचे सांगीतले. तिने तिच्या पुराव्या दरम्यान पुढे असे सांगितले की, दि. ०२.०७.२०२५ रोजी संध्याकाळी ०६.३० वाजताच्या सुमारास तिच्या पतीने तिच्याकडे मोबाईलच्या स्क्रीनला स्क्रॅच पडल्या संदर्भात विचारणा केली. त्यावेळेस तिने तिच्या पतीला ती

माहेरी गेल्यानंतर तिच्या मुलांनी मोबाईल टाकल्याने मोबाईलला स्क्रॅच पडल्याचे सांगितले. तिने तिच्या पुराव्यादरम्यान पुढे असे सांगितले की, त्यावेळेस तिच्या पतीने तिला शिवीगाळ करून तुला माहेरी कोणी जाण्यास सांगितले असे म्हटले आणि तिच्या पतीने तिला हातांनी व लाथाबुक्यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली असे काही घडले नसल्याचे तिने सांगितले. तिने तिच्या सरतपासा दरम्यान अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने तिला फितुर घोषित करून तिचा उलटतपास घेतला.

१०. अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान तिने तिच्या फिर्याद आणि पुरवणी जबाबातील अधोरेखांकित भाग "अ" मधील मजकुराबाबत तिला काही माहिती नसून पोलिसांनी तसा मजकूर तिच्या जबाबात का नमुद केला आहे याचे कारण ती सांगू शकत नाही असे तिने सांगीतले. तिने तिच्या उलटतपासा दरम्यान पुढे असे सांगीतले की सदर प्रकरणा संदर्भात तिच्यात व आरोपींच्या मध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असून त्यास पुरक अशी तडजोड पुरसिस निशाणी क्र.१२ नुसार दाखल केली आहे. सदरचे प्रकरण हे तडजोडीने मिटले असल्याने तिची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नाही.

११. ओमकार (सा.क्र.२) हा फिर्यादीचा भाऊ असून बापु (सा.क्र.३) हा फिर्यादीचा पिता आहे आणि ते जखमी साक्षीदार आहेत. त्यांनी आपल्या पुराव्यामध्ये असे सांगितले की, घटना ही कधी घडली हे त्यांना माहिती नाही. पोलिसांनी त्यांच्याकडे कोणतीही चौकशी केली नाही आणि त्यांचा कोणताही जबाब हा नोंदवला नाही. त्यांनी त्यांच्या सरतपासा दरम्यान अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य न केल्यामुळे अभियोग पक्षाने त्यांना फितुर घोषित करून त्यांचा उलटतपास घेतला. परंतु उलटतपासा दरम्यान त्यांनी अभियोग पक्षास कोणतेही सहाय्य केले नाही. त्यांनी त्यांच्या उलटतपासा दरम्यान असे सांगीतले की, सदर प्रकरणा संदर्भात फिर्यादी, त्यांच्या व आरोपीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असून त्या संदर्भात निशाणी क्र.१२ वर तडजोड पुरसिस दाखल केली आहे. त्यांनी त्यांची आता आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नाही असे सांगितले.

१२. अभियोग पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी वर्षा (सा.क्र.१) हिच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, तिने घटना ही कधी घडली हे तिला आठवत नसल्याचे सांगीतले. त्यावेळेस तिच्या व तिच्या पतीमध्ये वाद झाले होते त्यानंतर तिचे वडील त्याठिकाणी आले. त्यावेळी लाईट गेली होती त्यामुळे तिला कोणाचा धक्का लागला होता हे तिला माहिती नसल्याचे तिने सांगीतले. तिने

दि.०२.०७.२०२५ रोजी तिच्या पतीने तिला शिवीगाळ करुन हाताने आणि लाथाबुक्यांनी मारहाण केली असे काही घडले नाही असे सांगितले. तसेच तिने फिर्याद मधील मजकूर हा तिला माहिती नसल्याचे सांगितले. ती फितुर साक्षीदार आहे. तिने अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर प्रकरणा संदर्भात तिच्यामध्ये व आरोपींमध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे सांगितले आणि तिची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे सांगीतले.

१३. जखमी साक्षीदार ओमकार आणि बापु (सा.क्र. २ व ३) याच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी घटना ही कधी घडली हे त्यांना माहिती नसल्याचे सांगून पोलिसांनी त्यांच्याकडे घटने संदर्भात कोणतीही चौकशी केली नाही आणि त्यांचा कोणताही जबाब नोंदवला नसल्याचे सांगीतले. ते फितुर साक्षीदार आहेत. त्यांनी अभियोग पक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये सदर प्रकरणा संदर्भात त्यांचेत व आरोपींची कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचे सांगितले आणि त्याची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे सांगीतले.

१४. आरोपी पक्षामार्फत अभिलेखावरील घटनास्थळ/जप्ती पंचनामा (निशाणी क्र.१७) आणि फिर्यादी व जखमी साक्षीदार याचे वैद्यकिय प्रमाणपत्र (निशाणी क्र.१८ ते २०) हे मान्य केले. परंतू फिर्यादी वर्षा (सा.क्र.१), जखमी साक्षीदार ओमकार (सा.क्र.२) आणि बापु (सा.क्र. ३) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान आरोपींनी त्यांना कोणतीही मारहाण केली नाही असे सांगीतले त्यामुळे वैद्यकिय प्रमाणपत्रामधील नमुद जखमा या आरोपींनी फिर्यादीला व जखमी साक्षीदारांना मारहाण केल्यामुळे झाल्या असे म्हणता येत नाही.

१५. अभियोग पक्षामार्फत तपासणेत आलेल्या फिर्यादी वर्षा (सा.क्र.१) आणि जखमी साक्षीदार ओमकार (सा.क्र.२) व बापु (सा.क्र.३) हे फितुर साक्षीदार असून त्यांनी त्यांचे उलटतपासा दरम्यान सदर प्रकरणा संदर्भात त्यांचेमध्ये व आरोपींमध्ये तडजोड झाली असून सदरचे प्रकरण हे तडजोडीने कोर्टाबाहेर मिटल्याचे सांगितले. त्यास पुरक अशी तडजोड पुरसिस (निशाणी क्र.१२) ही फिर्यादी व आरोपी पक्षामार्फत दाखल करण्यात आली. फिर्यादी वर्षा (सा.क्र.१) आणि जखमी साक्षीदार ओमकार (सा.क्र.२) व बापु (सा.क्र.३) यांचा पुरावा आणि तडजोड पुरसिस (निशाणी क्र.१२) यांचे एकत्रित अवलोकन केले असता सदर प्रकरणा संदर्भात फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये सदरचे प्रकरण हे तडजोडीने मिटल्याचे दिसून येते. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेल्या साक्षीदार क्र.१ ते ३ यांचा पुरावा हा आरोपींविरूद्ध लावलेल्या गुन्हयातील घटकांची सिध्दता होणेकामी तुटपुंज्या स्वरूपाचा दिसून येतो.

१६. एकुणच वरील सर्व बाबींचा उहापोह केला असता अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेले फिर्यादी वर्षा (सा.क्र.१), जखमी साक्षीदार ओमकार (सा.क्र.२) व बापु (सा.क्र.३) हे फितुर साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान सदर प्रकरणा संदर्भात त्यांच्यात व आरोपींच्या मध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाली असून सदरचे प्रकरण मिटल्याचे सांगितले. तसेच त्यास पुरक अशी तडजोड पुरसिस ही (निशाणी क्र.१२) वर दाखल केली. त्यामुळे फिर्यादी वर्षा (सा.क्र.१), जखमी साक्षीदार ओमकार (सा.क्र.२) व बापु (सा.क्र. ३) यांचा पुराव्याचे आणि तडजोड पुरसिसचे एकत्रित अवलोकन केले असता सदर प्रकरणासंदर्भात फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये तडजोडीने सदरचे प्रकरण मिटल्याचे दिसून येते. त्यामुळे साक्षीदार क्र.१ ते ३ यांचा पुरावा हा आरोपींविरूद्ध लावलेले आरोप शाबीत करण्याकरीता तुटपुंज्या स्वरूपाचा दिसून येतो. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपी विरूध्द लावलेले आरोप हे संशयापलीकडे जावुन सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे संशयाचा फायदा हा आरोपींना देणे न्यायोचित होणार आहे. अभियोगपक्ष हा आरोपींविरूध्द लावलेले भारतीय न्याय संहिता२०२३ चे कलम ११८ (१),११५ (२) आणि ३५२ सह कलम ३(५) अन्वयेचे आरोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला. सबब मी मुद्दा क्र. १ ते ३ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

१७. जप्त मुद्देमाल एक चिव्याची काठी ही उपयोगहीन व मुल्यहीन असल्याने ती अपिल कालावधी नंतर नियमा नुसार नाश करण्यात यावी.

<u>मुद्या क्रमांक ४ बाबतः</u>

मुद्या क्रमांक १ ते ३ च्या नकारार्थी निष्कर्षावरून मी मुद्दा क्रमांक. ४ च्या उत्तरा दाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

आदेश

१. आरोपी क्र.१ हिंदुराव बाबु सावेकर आणि आरोपी क्र.२ सजित हिंदुराव सावेकर यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७१(१) प्रमाणे भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८ (१),११५ (२) आणि ३५२ सह कलम ३(५) च्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल एक चिव्याची काठी ही उपयोगहीन व मुल्यहिन असल्याने ती

अपिल कालावधीनंतर नियमानुसार नाश करण्यात यावी.

३. आरोपी क्रमांक १ व २ यांचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

४. आरोपी क्रमांक १ व २ यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४८५ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/- इतक्या रकमेचा वैयक्तीक जात मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by SONALI VIJAYKUMAR JANGAMSWAMI
Date: 2026.05.04 13:45:25 +0530

एस.व्ही.जंगमस्वामी ,
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा
जिल्हा-कोल्हापूर

ठिकाण : पन्हाळा
दिनांक :०४.०५.२०२६.